दगडाची तपासणी

दगडाची तपासणी

एक आफ्रिकन लोककथा

मराठी: अश्विनी बर्वे

मॅट नावाचा एक मुलगा संपूर्ण दिवसभर पायी चालत होता.



दुसऱ्या गावामध्ये त्याचे आजोबा राहत होते, तिथे तो चालला होता.

रात्रीच्या वेळी मॅटने रस्त्याच्या बाजूला विश्रांती घेण्याचे ठरवले. संपूर्ण दिवस पायी प्रवास केल्याने तो दमला होता. त्याच्या खिशामध्ये काही नाणी होती. ती चोरी होऊ नये म्हणून त्याने ती नाणी एका मोठ्या दगडाखाली लपवून ठेवली.

त्यानंतर मॅट चांदण्या रात्री विश्रांती घेऊ लागला.

पण मॅट एकटे नाही होता.

दुसऱ्या दिवशी मॅट सकाळी उठला तेव्हा त्याला खूप भूक लागली होती. त्याने नदीवर जाऊन अंघोळ केली आणि मग कुठेतरी नाष्टा विकत घेऊ असे त्याने ठरवले.पण जेव्हा तो दगडाखाली लपवलेली नाणी घ्यायला गेला तेव्हा तिथे फक्त माती होती.

त्याने मोठ्या दगडापासून ते प्रत्येक दगडाखाली पैशांचा शोध घेतला. त्याचे हृदय जोरजोरात धडधडत होते. संपूर्ण जगात त्याच्या मालकीची अशी तेवढीच नाणी होती. त्याने मोठ्या कष्टाने प्रत्येक दगड उचलून बघितला पण त्याला काहीच सापडले नाही.



तो धापा टाकत चालत होता आणि ओरडत होता. तेव्हा गावातल्या लोकांनी त्याचा आवाज ऐकला आणि ते त्याच्याभोवती जमा झाले. म्हणजे तो त्यांना काय झाले हे सांगेल असे त्यांना वाटले.

“तू रात्री झोपतांना काही पाहिले का?” गावाच्या प्रमुखाने त्याला विचारले.

मॅटने डोके हलवले.

"तो दगड कुठे आहे?" गावच्या प्रमुखाने विचारले. तेव्हा मॅटने जिथे त्याने नाणी लपवली होती त्या जागेकडे बोट दाखवले. प्रमुखाने स्वतःचे डोके खाजवले. मग त्याने हात वर केला आणि म्हणाला "हा दगड ताब्यात घ्या, यावर खटला चालेल." आपण चुकीचे ऐकले असावे असे वाटून कोणीही हलले नाही. "हा दगड कोर्टात घेऊन जा," चीफ म्हणाला. "कशाची वाट पाहत आहात?" प्रमुख म्हणाला.

ताकदवान माणसांनी आरोपीला उचलून कोर्टात नेले. कोर्ट उत्सुक लोकांनी आधीच भरलेले होते. हवालदाराने गर्दीला शांत केले जेव्हा आरोपी दगड आणि त्या मुलाला कोर्टासमोर हजर केले.



पण गोष्टी सुरू होण्यापूर्वीच हंसाचे कुटुंब कोर्टात शिरले. त्यामुळे गोंधळ झाला. पण वकिलाने विचारले दगडाला म्हटले, “दगडा कबूल कर तू, मॅटची नाणी चोरली का नाही ते?”

मग कारकुनाला नोंद करायला सांगितले गेले की दगडाने उत्तर दिले आहे. शर्ट घातलेला एक माणूस जोरात हसला तेव्हा सरदाराने त्याच्याकडे कठोर नजरेने पाहिले. "रस्त्यावर काय करत होता?" सरदाराने दगडाला विचारले. गर्दीत आणखी हशा पिकला."न्यायालयात शांतता," सरदार म्हणाला आणि तो गंभीर दिसत होता. “दगडा, तू कोणत्या गावाचा आहेस?" त्याने विचारले.

दगडाने कोणतेही उत्तर नाही दिले.
पण तेव्हाच हसू थांबवण्यासाठी एका स्त्रीने आपले तोंड कपड्याने झाकले. “सांग दगडा तुझे आई वडील कोण आहेत ते कुठे राहतात?” प्रमुखाने पुढील प्रश्न विचारले.

पण बिचारा दगड शांतच राहिला. मग प्रमुखाने लिपिकाला सांगितले की नोंद करा की दगडाने काहीच उत्तर दिले नाही. त्याने न्यायालयाचा अपमान केला. म्हणून त्याला शिक्षा दिली जाईल. पण दगड हसला नाही की रडला नाही, पण गर्दीतला लाल शर्ट घातलेला माणूस एवढा हसू लागला की हसता हसता तो जमिनीवर पडला.

तहे पाहिल्यानंतर प्रमुख उठून उभा राहिला आणि तो लिपिकावर ओरडला.म्हणाला की नोंद करा कोर्टातल्या लोकांनी आवाज करून कोर्टाचा अपमान केला आहे. त्यामुळे प्रत्येकाकडून एक एक नाणं गोळा करा. उठणे उभे घडले आणि लिपिक पण ओरडला.प्रमुखाने गोळा केलेली नाणी मॅटला दिली.

त्यामुळे मॅटला अत्यंत आनंद झाला आणि तो आपल्या आजोबांच्या घराकडे निघाला. पण त्या आधी त्याने पोटभर नाष्टा केला.

प्रमुखाने लाल शर्ट घातलेल्या माणसाला आदेश दिला की तो दगड परत होत्या त्या जागेवर नेवून ठेव.

शेवट